# मे. गुमगांव मँगनिज खाण, मॉईल, गांव गुमगांव खापा, ता. सावनेर, जि. नागपूर या खाण उद्योगाचा प्रस्तावित भूमिगत खाण प्रस्तावाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त

मे. गुमगांव मँगनिज खाण, मॉईल, गांव गुमगांव खापा, ता. सावनेर, जि. नागपूर यांची भुमिगत खाणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. २० फेब्रुवारी २०२० रोजी गुमगांव खाण कार्यालयाच्या परिसरात १२.०० वाजता घेण्यात आली होती. सदर जाहिर लोकसुनावणी, मा. रविन्द्र खजांजी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली असुन, श्री. अतुल सातफळे, क्षेत्र अधिकारी, प्रादेशिक अधिकारी, नागपुर (सदस्य) यांचे प्रतिनीधी या नात्याने उपस्थित होते. श्रीमती हेमा देशंपाडे, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ या हे सदर जाहिर सुनावणीच्या संयोजक होत्या.

सदर जाहिर लोकसुनावणीस इतर अधिकारी, तसेच जनता मोठया प्रमाणात उपस्थित होती. उपस्थिंताची स्वाक्षरी हजेरी पटावर घेण्यात आली. (प्रत संलग्न)

मे. गुमगाव मँगनिज खाण, मॉईल, गांव गुमगांव खापा, ता. सावनेर, जि. नागपूर या खाण उद्योगाने १२६.८४ हेक्टर खाण क्षेत्रावर १०२००० मे. टन प्रति वर्ष मँगनिज खनीज उत्खननासाठी वने व पर्यावरण, हवामान बदल, मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण विषयक अनुमतीसाठी व मंत्रालयाने दिलेल्या टर्म्स ऑफ रेफंरन्सनुसार आवश्यक जाहिर लोकसुनावणीसाठी मंडळाकडे अर्ज सादर केला होता. मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्र. MPCB/JD(WPC)/P. Hearing/B-४१७६, दि.२२/१०/२०१९ अन्वये, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची प्रक्रिया सुरु करण्याविषयी मंजुरी प्रदान केली होती.

पर्यावरण आघात मुल्यांकन, अधिसुचना दि. १४ सष्टेबर २००६ व सुधारित नियम दि. १/१२/२००९ च्या तरतुदीनुसार जाहिर लोकसुनावणीचे स्थळ, दिंनाक व वेळ, मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांची मंजुरी घेऊन निश्चित करण्यात आले होते. (प्रत संलग्न)

म. प्र. नि. मंडळाच्या मुख्यालयाने आदेश क्र. BO/JD(WPC)/P. H./B-९२५, दि. ३०/०१/२०२० अन्वये सदर जाहिर लोकसुनावणी दि. २०/०२/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता खाण कार्यालय परिसरात, मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षेखाली घेण्याबाबत कार्यालयीन आदेश जारी केला होता. (प्रत संलग्न)

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची जाहिरात तीस दिवसांचे मुदतीसह दै. द हिंतवाद (इंग्रजी वृत्तपत्र) तसेच दै. तरुण भारत (मराठी वृत्तपत्र) दि. १८/०१/२०२० च्या अंकामध्ये प्रसिध्द करण्यात येवुन जनतेकडुन आक्षेप मागविण्यात आले होते (प्रत संलग्न)

उद्योगाने म. प्र. नि. मंडळास जाहिर लोकसुनावणी करीता सादर केलेले पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल पर्यावरण व्यवस्थापन आराखडा व प्रस्तावित प्रकल्पाच्या कार्यकारी सारांशाच्या मराठी व इंग्रजी भाषेतील प्रती कार्यकारी सारांश खालील ठिकाणी जनतेच्या माहितीसाठी तसेच अभ्यासण्याकरीता ठेवण्यात आले होते.

१) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई.

२) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

३) जिल्हा परिषद, नागपूर.

४) जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर.

५) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

६) प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, नागपुर.

७) उप - प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, नागपूर-१.

८) ग्रामपंचायत कार्यालय, गुमगांव, ता. सावनेर, जिल्हा- नागपूर.

९) ग्रामपंचायत कार्यालय तिगई, ता. सावनेर, जिल्हा- नागपूर.

१०) ग्रामपंचायत कार्यालय कोदेगांव, ता. सावनेर, जिल्हा- नागपूर.

११) तहसिल कार्यालय, सावनेर, ता. सावनेर, जिल्हा- नागपूर.

१२) उप-विभागीय अधिकारी, सावनेर, ता. सावनेर जिल्हा नागपूर.

१३) प्रादेशिक कार्यालय, वने व पर्यावरण मंत्रालय, वातावरण बदल, तळ मजला, पूर्व विंग, नविन सचिवालय बिल्डिंग, सिव्हील लाईन, नागपुर. ४४०००१.

तसेच सदर अभ्यास अहवालाची प्रत मंडळाचे mpcb.gov.in या संकेत स्थळावर सुध्दा जनतेसाठी उपलब्ध करण्यात आली होती.

पर्यावरणीय जाहिर लोकसुनावणी घेण्याच्या आधी या कार्यालयास कोणतेही निवेदन/आक्षेप प्राप्त झाले नव्हते परंतु सुनावणी दरम्यान चार लेखी निवेदन प्राप्त झाले होते. (प्रत संलग्न)

जनसुनावणीची प्रक्रिया १२.०० वाजता सुरु करण्यात आली. श्रीमती हेमा देशपांडे, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी मा. अध्यक्षांची परवानगी घेऊन जनसुनावणीची प्रक्रिया सुरु केली. प्रास्ताविक भाषणादरम्यांन त्यांनी जाहिर लोकसुनावणीच्या प्रक्रियेची पुर्ण माहिती दिली व सदर लोकसुनावणी समितीस पर्यावरण विषय अनुमतीसाठी शिफारस करणे अथवा मंजुरी प्रदान करण्याचे अधिकार नसल्याचे सांगितले. लोकसुनावणीचे इतिवृत्त, प्राप्त लेखी निवेदने व व्हीडीओ रेर्कोडिंग पुढील कार्यवाहीसाठी मंत्रालयास सादर करण्यात येत असल्याचे त्यांनी भाषणा दरम्यान सांगितले. सदर प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्यासाठी त्यांनी उद्योगाचे प्रतिनिधीस आंमत्रित केले.

खाण प्रवर्तक यांचे तांत्रीक सल्लागार वोलकेम इं. लि. यांचे प्रतिनिधी श्री. मुदलियार यांनी सदर खाणीबाबत तांत्रिक सादरीकरण मराठी भाषेमध्ये करुन पर्यावरण विषयक आघात व त्यासाठीच्या उपाययोजनांची माहिती दिली.

श्रीमती हेमा देशपांडे यांनी उपस्थित जनतेमधुन आक्षेप / सुचना असल्यास समितीपुढे सादर करण्याविषयी विनंती केली.

**<u>श्री. छगन गोंडें, माजी उपाध्यक्ष, नगर परीषद, खापा :-</u>**

पर्यावरण संवर्धनासाठी मॉईल व्यवस्थापनाने मोठया प्रमाणात वृक्ष लागवड केलेली असून पर्यावरणाविषयी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही.

**<u>श्री. वामन मासुरकर, खापा</u>**

१. माईल व्यवस्थापनाव्दारे आजुबाजुच्या गांवाना नेहमीच मदत केली जाते. खापा – वाकोडी या पांदन रस्त्याची अवस्था फारच बिकट असून शेतकऱ्यांना मोठा त्रास आहे व मॉईल व्यवस्थापनाने याबाबत मदत करावी.
२. स्थानिक लोकांना रोजगारांसाठी प्राधान्य देण्यात यावे तसेच पर्यावरण विषयक नियमांना अधिन राहून मंजुरी दयावी.
३. गुमगांव खाणीच्या विस्तारीकरण प्रकल्पाच्या मागील जनसुनावणीमध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत माहिती देण्यात यावी.

**श्री. किशोर गजभिये, सरपंच, कोंदेगाव :-**

१. पर्यावरणविषयक काहीच तक्रार नाही.

२. स्थानिक लोकांना रोजगार देण्यात यावा.

३. गावाचे पिण्याचे पाण्यामध्ये मोठया प्रमाणात क्षार असल्याने शुदध पाणी पुरवठयाकरीता आर. ओ. प्लान्ट गावांमध्ये बसवुन देण्यात यावा. याबाबतची मागणी मागील जनसुनावणीमध्ये करण्यात आली होती परंतु मॉईल व्यवस्थापनाने अजुन त्याची दखल घेतलेली नाही.

४. CSR फंडामधुन गावांचा विकासाची कामे करण्यात यावी.

**श्री. लोकनाथ नारनवरे, खापा :-**

१. भूमिगत खाणीमध्ये बारुद स्फोट करण्यात येत असुन त्यामुळे जन आरोग्यावर परीणाम होणार नाही यासाठी आवश्यक प्रतिबंधीत उपाययोजना करावी.

२. खनिज वाहतुकीच्या वाहनांचे पार्किग अपूरी असुन वाहतुकीमुळे होणाऱ्या हवा प्रदुषण नियत्रंणासाठी आवश्यक उपाय योजना करण्यात यावी.

३. स्थनिक लोकांना रोजगार देण्यात यावा.

**श्री. गजानन तितरे, खापा :-**

प्रस्तावित खाण प्रकल्पाचे स्वागत करुन पर्यावरणाविषयी नाही तक्रार नसुन मोठया प्रमांणामध्ये रोजगार निर्मितीची अपेक्षा केली.

**श्री. प्रफुल मोहते, खापा :-**

१. सदर प्रकल्पाविषयी काही तक्रार नाही.

२. माईल व्यवस्थापनाने मोठया प्रमांणामध्ये हरीत पटटे निर्माण केले असून CSR अंतर्गत परीसरातील गावामध्ये विकास कामे केली आहेत.

**श्रीमती, संगीता बावीस्कर, सरपंच, तिगई, :-**

१. पर्यावरणविषयक कोणत्याच प्रकारची तक्रार नाही.

२. गावामध्ये पिण्याचे पाण्याचे दुर्भिष्य असून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी तसेच गावातील लोकांना वैयक्तिक शौचालये बांधून देण्याची विनंती केली.

३. CSR अंतर्गत विकासकामे करण्यात यावे तसेच स्थनिक लोकांना रोजगार देण्यात यावा.

**श्री. लोकेश भगत, तिगई :-**

१. प्रकल्पाचे स्वागत केले.

२. खाणीतील निघणारे पाण्याचे योग्य प्रकारे प्रकिया करण्यात यावे.

३. तिगई गावातील लोकांना वैयक्तिक शौचालये बांधुन देण्यात यावी.

**श्री. देविदास नगराळे :-**

१. मॉईल व्यवस्थापनाने ठिकठिकाणी वृक्ष लागवड केलेली असुन त्यापैकी जिवंत असलेल्या वृक्षांची नोंद ठेवण्यात यावी.

२. प्रकल्प क्षेत्राच्या पाच कि. मी. परीघातील लोकांना त्यांच्या शैक्षणिक व व्यवसायीक कौशल्याच्या आधारावर रोजगार देण्याची विनंती केली.

३. स्थानिक लोकांना जास्तीत जास्त प्रमाणांमध्ये रोजगांराच्या संधी निर्माण करण्याची विनंती केली.

**श्री. जानराव बावीस्कर, तिगई :-**

त्यांच्या गावाजवळच्या कोची बंधाऱ्या विषयी तक्रार सादर केली असता मा. अध्यक्ष यांनी संबंधित विभागाकडे तक्रार करण्याविषयी सुचना केली.

श्री. मधुबाबु यांनी लेखी निवेदन देत असल्याचे सांगितले.

**श्री. मानेकर महाव्यवस्थापक** :- मॉईल यांनी सांगितले की गावकऱ्यांनी सुनावणी दरम्यान मांडलेल्या सर्व सुचना तसेच मागण्यांचे पुर्णपणे पूर्तता करण्याची ग्वाही दिली.

श्री. सि. व्ही. अतुलकर कार्यकारी निदेशक (तांत्रिक) यांनी खालीलप्रमाणे आश्वासन दिले.

१. सदर प्रकल्पाकडे प्रभावित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना नोकरी तसेच भरपाई देण्यात येईल.

२. गावांमध्ये शुदध पिण्याचे पाण्यासाठी आर. ओ. प्लांट लावण्यात येईल.

३. भूमिगत खाणीमध्ये करण्यात येणाऱ्या स्फोटामुळे जमिनीवर प्रदुषण होणार नांही व योग्य ती खबरदारी घेण्यात येईल.

४. खनिज वाहतुकींच्या वाहनांचे योग्य प्रकारे नियोजन करण्यात येईल जेणे करुन परीसरांमध्ये हवा प्रदुषण होणार नाही.

५. मागणी केल्याप्रमाणे तिगई गावांमध्ये वैयक्तिक शौचालये बांधून देण्यात येईल.

६. परीसरांमध्ये लोकांना कौशल्याच्या आधारावर रोजगारांमध्ये प्राधान्य देण्यात येईल.

७. वृक्ष लागवडीबाबत योग्य ती देखरेख करण्यात येते. लिज क्षेत्राच्या बाहेरील भागांमधील वृक्षांची देखभाल करण्यात येईल.

८. मागील जनसुनावणीमध्ये दिलेल्या आश्वासनानुसार सुमारे २.० कोटी रुपयांचे कामे एका वर्षामध्ये करण्यात येईल.

श्रीमती हेमा देशपांडे, संयोजक यांनी CER/CSR अंतर्गत निधींची उपलब्धता व कामाबाबत अधिक माहिती देण्याविषयी सुचना केली.

मॉईल व्यवस्थापनाव्दारे सांगण्यात आलेली सदर कामाबाबतची माहिती प्रस्तवित असून जाहीर लोकसुनावणीतील मुददयांचा अंर्तभाव करुन कामांचा तपशिल निश्चित करण्यात येईल.

समारोपीय विवेचनामध्ये **मा. अध्यक्ष** यांनी सांगितलेली आजच्या जनसुनावणीमधील सर्व सुचनांचे / आक्षेपांचे नोद घेण्यात आली आहे. सुनावणी दरम्यान मांडण्यात आलेल्या सर्व सुचनांच्या उहापोह करुन मॉईल व्यवस्थापनाव्दारे सर्व सुचनांचे /आक्षेपांचे उत्तर देण्यात आले असल्याचे सांगितले. गावकऱ्यांच्या पांदन रस्त्यांचे तक्रार निराकरण करण्यासाठी मॉईल व्यवस्थापनांने जिल्हा प्रशासनाची मदत घेण्याविषयी सुचना केली.

परीसरातील युवकांमध्ये रोजगारांच्या अधिक संधी निर्माण करण्यासाठी कौशल्य विकास शिक्षण मार्गदर्शन उपक्रम राबविण्याची सुचना केली.

उपस्थिंताचे आभार मानुन लोकसुनावणीचे कामकाज समाप्त करण्यात आले

(अशोक करे)
सदस्य, तथा
प्रादेशिक अधिकारी, नागपूर

(हेमा देशपाडें)
संयोजक, तथा
उप - प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१

(रविंद्र खजांजी)
अध्यक्ष, तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर